# महाप्रित कंपनीमध्ये खालील पदांवर प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करण्यासाठी सूचना

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या "महात्मा फुले नविनीकरणीय उर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित) उपकंपनीच्या स्थापनेस व महाप्रित या कंपनीस, शासन ते शासन कामे करण्यास शा. नि., सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.२९/महामंडळे, दि. १० जुलै, २०२३ अन्वये परवानगी देण्यात आली आहे.

२. महाप्रित कंपनीकडून राबविण्यात येणाऱ्या विविध क्षेत्रातील प्रकल्पांमध्ये "परवडणारी घरे आणि शहरी नियोजन" या प्रकल्पाचा समावेश आहे. या प्रकल्पातंर्गत ठाणे शहरामध्ये समूह गृहविकास प्रकल्प, मौ. जांभूळ, मोहिली, ता. कळवा, जि. ठाणे येथे मागासवर्गीय दुर्बल घटकांकरिता घरबांधणी योजना तसेच मुंबई शहरातील ५६ झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रस्तावित असून या योजनातंर्गत निर्माण होणाऱ्या गृहसंकुलाची नोंदणी व इतर अनुषंगिक कामे नियोजित आहेत तसेच राज्यातील सहकारी साखर कारखान्यांचे सौर उर्जीकरण प्रकल्प आयुक्त, साखर संचालनालय यांच्यामार्फत प्रस्तावित असून त्यांची अंमलबजावणी तद्नुषंगिक बाबींकरिता "सहनिबंधक (सहकारी संस्था)" या संवर्गातील अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करावयाची आहे. महाप्रित कंपनीमध्ये प्रतिनियुक्तीने नियुक्ती झाल्यास, त्यांना शासनाकडून मिळणारे सध्याचे वेतन व भत्ते व इतर सुविधा शासन नियमानुसार उपलब्ध राहतील.

३. महामंडळ मागास जाती व दुर्बल घटकांच्या लोकांसाठी कार्यरत असून दुर्बल घटकांना रोजगाराची संधी निर्माण करणे व त्याकरीता त्यांना उपयुक्त व परवडणारे शिक्षण देण्यासाठी महाप्रित कंपनीमार्फत हायब्रिड स्किल युनिव्हर्सिटी स्थापन करण्याचे नियोजित आहे. सदर विद्यापिठामध्ये स्टार्टअप, कौशल्य, उद्योजकता, व्यवसायाकरिता व्यावसायिक शिक्षण प्रामुख्याने देण्यात येणार आहे. सदर विद्यापीठाकरिता शासनाने शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, क्र. २७२४/प्र.क्र.२५/ज-४, दि. १४/१०/२०२४ अन्वये मौजे खिडकाळी ता. जि. ठाणे या ठिकाणी शासकीय जमीन विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. विद्यापीठ कायद्याच्या अनुषंगाने नियोजित महाराष्ट्र हायब्रिड स्किल युनिव्हर्सिटीच्या स्थापनेबाबत पुढील कार्यवाही करण्यासाठी तसेच विद्यापीठविषयक इतर पुढील कामकाजासाठी, उच्च शिक्षण क्षेत्रात/विद्यापीठात कार्यरत असणाऱ्या "उपनिबंधक" (Dy. Registrar) या स्तरावरील एका अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीवर महाप्रित कंपनीत नियुक्ती करावयाची आहे. महाप्रित कंपनीमध्ये प्रतिनियुक्तीने नियुक्ती झाल्यास, त्यांना शासनाकडून मिळणारे सध्याचे वेतन व भत्ते व इतर सुविधा शासन नियमानुसार उपलब्ध राहतील.

४. उपरोक्त पदावर प्रतिनियुक्तीने काम करण्यास इच्छुक असणाऱ्या अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या मंत्रालयीन प्रशासकीय विभागामार्फत सादर करुन त्याची एक आगाऊ प्रत महाप्रित कंपनीच्या कार्यालयाकडे कृपया पाठवावी.

**महाप्रित कार्यालयाचा पत्ता-**
**महात्मा फुले नविनीकरणीय उर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी मर्यादित (महाप्रित),**
**५ वा मजला, पिनॅकल कॉर्पोरेट पार्क,**
**ट्रेड सेंटरच्या पुढे, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स,**
**वांद्रे (पू), मुंबई- ४०००५१.**